## आजचे पंचांग

मंगळवार, दि. २६ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, एकादशी (अहोरात्र) तिथी,
दिवस नक्षत्र– हस्त रात्री ५-५७ पर्यंत नंतर चित्रा
चंद्र रास - कन्या, सूर्य रास - वृषभ,
गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## हापूस हंगामाची अखेर

**पुणे** : फळांचा राजा असलेल्या कोकणातील हापूसचा हंगाम संपत आल्याने, नागरीकांनी अन्य फळांच्या खरेदीकडे आपला मोर्चा वळविण्यास सुरवात केली आहे. हापुस आता काही दिवसच उपलब्ध होईल. बाजारात दाखल होत असलेल्या मालाच्या तुलनेत मागणी वाढल्याने डाळिंबाच्या भावात पाच ते दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर, मागणीच्या तुलनेत आवक घटल्याने कलिंगड, खरबूज आणि पपईच्या भावात किलोमागे दोन ते तीन रुपयांनी वाढ झाली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. २६ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २४० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### राजधानी दिल्लीत उष्ण रात्रीची नोंद

**नवी दिल्ली** : भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीत सोमवारी कमाल तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले, तर शहरात सुमारे १४ वर्षांतील सर्वात उष्ण मेची रात्र नोंदली गेली. सफदरजंग येथे कमाल तापमान सामान्यपेक्षा ३.३ अंश जास्त म्हणजे ४३.५ अंश सेल्सिअस नोंदले गेले, तर किमान तापमान सामान्यपेक्षा ५.७ अंश जास्त म्हणजे ३२.४ अंश सेल्सिअस नोंदले गेले.

### इंधन, खतं आणि परकीय चलन हीच चिंता

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतासमोर 'इंधन, खतं आणि परकीय चलन' ही तीन मोठी आव्हाने उभी ठाकल्याचा इशारा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिला आहे. मुंबईत 'सिडबी'च्या ३७ व्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलताना त्यांनी जागतिक परिस्थितीमुळे भारतावरील आर्थिक दबाव प्रामुख्याने बाह्य घटकांमुळे वाढत असल्याचे स्पष्ट केले. सीतारामन म्हणाल्या की, भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, खतं आणि सोन्याच्या आयातीवर अवलंबून आहे.

### बीएसएनएलच्या महसुलात १९ टक्के वाढ

**नवी दिल्ली :** सरकारी मालकीच्या दूरसंचार कंपनी बीएसएनएलचा महसूल पायाभूत सुविधांमधील सुधारणांमुळे दोन वर्षांत सुमारे १९ टक्क्यांनी वाढून २५ हजार कोटी रुपये झाला आहे. दूरसंचार राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी यांनी दिलेल्या मुलाखतीचा हवाला देत निवेदनात म्हटले आहे की, बीएसएनएलच्या परिवर्तनासाठी पद्धतशीर दृष्टिकोनामुळे त्याच्या आर्थिक कामगिरीत सुधारणा झाली आहे.

### १० दिवसांत इंधन तब्बल साडेसात रुपयांनी महाग

# मोदी हैं तो मुमकीन है!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशातील सामान्य नागरिकांना महागाईचा आणखी एक मोठा झटका बसला असून, पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अवघ्या दहा दिवसांत चौथ्यांदा वाढ करण्यात आली आहे. केंद्र सरकार इंधन दरवाढ करून उत्पन्नामध्ये वाढ करण्याचा एकीकडे प्रयत्न करत असताना दुसरीकडे मात्र सर्वसामान्यांना नाहक त्रास आणि भुर्दंड सहन करावा लागत आहे मोदी हैं तो मुमकीन है अशी म्हणण्याची वेळ आता आली आहे.

सोमवारी पुन्हा पेट्रोलच्या दरात प्रतिलिटर २.६१ रुपये तर डिझेलमध्ये २.७१ रुपये इतकी वाढ जाहीर करण्यात आली. त्यामुळे १५ मेपासून आतापर्यंत



पेट्रोल-डिझेलच्या किमती एकूण सुमारे ७.५० रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. वाढत्या इंधनदरांमुळे देशभरात महागाईचा दबाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यास सुरुवात केली आहे. पश्चिम आशियातील संघर्ष, इराण-अमेरिका तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील पुरवठा विस्कळीत झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात मोठी उसळी आली आहे. त्याचा थेट परिणाम भारतातील इंधन दरांवर होत आहे.

नव्या दरांनुसार दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर १०२.१२ प्रतिलिटर तर डिझेलचा दर ९५.२० झाला आहे. मुंबईत पेट्रोल १११.२१ आणि डिझेल ९७.८३ प्रतिलिटरवर पोहोचले आहे. बंगळुरू, चेन्नई आणि कोलकात्यासारख्या महानगरांमध्येही इंधनदरांनी विक्रमी पातळी गाठली आहे. काही शहरांमध्ये पेट्रोलने ११० चा टप्पा ओलांडला आहे.

विशेष म्हणजे, भारतात जवळपास चार वर्षांनंतर इंधन दरवाढीची मोठी मालिका सुरू झाली आहे. १५ मे रोजी पहिली वाढ जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर १९ मे, २३ मे आणि आता २५ मे रोजी पुन्हा दरवाढ करण्यात आली. तेल कंपन्यांचे म्हणणे आहे की, जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या किमती, वाहतूक खर्च आणि पुरवठा अडचणी लक्षात घेऊन हा निर्णय घ्यावा लागला.

दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांबरोबरच शेतकरी, वाहतूक व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. डिझेल महागल्याने मालवाहतूक खर्च वाढणार असून त्याचा परिणाम भाजीपाला, धान्य, फळे आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होणार आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेल दरवाढ झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही मोठी वाढ होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अर्थतज्ज्ञांच्या मते, पश्चिम आशियातील परिस्थिती लवकर नियंत्रणात आली नाही तर कच्च्या तेलाचे दर आणखी वाढू शकतात.

## पेट्रोल-डिझेल दरवाढीवरून राहुल गांधी यांचे टीकास्त्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. राहुल गांधी यांनी इंधन दरवाढ ही सामान्य नागरिकांच्या खिशावर थेट हल्ला असल्याचा आरोप केला.

राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, निवडणुका संपल्यानंतर केंद्र सरकार नागरिकांवर महागाईचा भार टाकत आहे. पेट्रोल-डिझेल दरात अल्पावधीत वारंवार वाढ करून सामान्य जनता, मध्यमवर्ग आणि शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीत ढकलले जात असल्याचे त्यांनी म्हटले.

राहुल गांधी यांनी सरकारवर "जनतेची लूट" केल्याचा आरोप करत म्हटले की, "निवडणुकांमध्ये



आश्वासनं दिली जातात आणि निवडणुका संपताच महागाईचा मारा सुरू होतो." त्यांनी वाढत्या इंधन दरांमुळे देशात मोठे आर्थिक संकट निर्माण होण्याचा इशाराही दिला.

दरम्यान, काँग्रेससह विविध विरोधी पक्षांनी देशभरात आंदोलनाची भूमिका घेतली आहे. अनेक राज्यांत पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात निदर्शने करण्यात आली असून, सरकारने तातडीने दरवाढ मागे घ्यावी, अशी मागणी केली जात आहे.

## मनीषा हवालदारला सहा दिवसांची सीबीआय कोठडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : नीट पेपरफुटी प्रकरणातील तपासाला वेग आला असून, केंद्रीय अन्वेषण विभागाने मनीषा हवालदार, प्रल्हाद कुलकर्णी आणि मनीषा वाघमारे यांना विशेष सीबीआय न्यायालयात हजर केले. न्यायालयाने मनीषा हवालदारला सहा दिवसांची सीबीआय कोठडी, प्रल्हाद कुलकर्णीला ४८ तासांची सीबीआय कोठडी तर मनीषा वाघमारे हिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

सकाळच्या सत्रात भौतिकशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या भाषांतराशी संबंधित प्राध्यापक मनीषा हवालदार हिला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान सीबीआयच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, भौतिकशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका मनीषा हवालदार हिच्याकडे आली होती आणि तिच्याकडूनच प्रश्नपत्रिकेचे सर्क्युलेशन झाल्याचा संशय आहे. आर्थिक फायद्यासाठी काही विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका पुरवल्याचाही संशय तपास यंत्रणेला असल्याचे सीबीआयने नमूद केले.

या संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास करण्यासाठी सीबीआयने सहा दिवसांच्या कोठडीची मागणी केली. त्यास विरोध करत बचाव पक्षाने मनीषा हवालदार या केवळ भाषांतराचे काम करत असल्याचा दावा केला. तपासात आम्ही पूर्ण सहकार्य करत आहोत आणि आतापर्यंत तिच्याविरोधात ठोस पुरावे समोर आलेले नाहीत, असे न्यायालयात सांगितले.

### १२०० फूट खोल दरीत कार कोसळली

## आंबेनळी घाटातील अपघाताचा ८ जणांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रायगड** : रायगड जिल्ह्यातील आंबेनळी घाटात स्कॉर्पिओ कार तब्बल १२०० फूट खोल दरीत कोसळून आठ जणांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेत आता धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा अपघात शनिवारी रात्रीच झाला होता, मात्र अंधार आणि घाटातील भीषण भौगोलिक परिस्थितीमुळे तब्बल २४ तास कोणालाही या दुर्घटनेचा पत्ता लागला नव्हता.

रायगड आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवरील दाभिळ टोक परिसरात हा अपघात झाला. आंबेनळी घाट हा अत्यंत धोकादायक घाटमार्ग मानला



जातो. तीव्र उतार, धोकादायक वळणे आणि खोल दऱ्यांमुळे येथे वारंवार अपघात घडत असतात. शनिवारी रात्री झालेल्या या अपघातात स्कॉर्पिओ कार थेट खोल दरीत कोसळली. मात्र रात्रीच्या अंधारामुळे कोणालाही याची कल्पना आली नाही.

मृतांपैकी पाच तरुण सातारा जिल्ह्यातील आसगाव येथील होते. हे सर्व बालपणापासूनचे मित्र असून पिकनिकसाठी हर्णे समुद्रकिनारी गेले होते. शुक्रवारी रात्री ते साताऱ्यातून निघाले होते. शनिवारी दिवसभर समुद्रकिनारी फिरून रात्री ते परतीच्या प्रवासाला निघाले. मृतांपैकी रितेश लोखंडे यांच्या वडिलांनी सांगितले की, शनिवारी रात्री मुलाने फोन करून "आम्ही रात्री दहा वाजता निघतोय" असे सांगितले होते. मात्र रविवारी सकाळपर्यंत तो घरी न पोहोचल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. वारंवार फोन करूनही प्रतिसाद मिळत नव्हता. त्यानंतर नातेवाईक आणि पोलिसांच्या मदतीने शोधमोहीम सुरू करण्यात आली.

पोलिसांनी मोबाईल लोकेशन ट्रॅक केल्यानंतर शेवटचे लोकेशन पोलादपूर-आंबेनळी घाट परिसरात आढळले. त्यामुळे पोलिसांना अपघाताचा संशय आला. त्यानंतर ट्रेकर्सना पाचारण करून दरीत शोधमोहीम सुरू करण्यात आली.

सुरुवातीला दरीत एक जुनी अपघातग्रस्त कार आढळली. त्यामुळे काही काळ संभ्रम निर्माण झाला. मात्र पुन्हा तपासणी केल्यानंतर आणखी खोल दरीत स्कॉर्पिओ कार दिसून आली. रात्री अंधारामुळे मृतदेह बाहेर काढणे शक्य नव्हते. सोमवारी सकाळी ट्रेकर्सनी दोरी आणि स्ट्रेचरच्या सहाय्याने मृतदेह बाहेर काढले.

या घटनेनंतर घाटरस्त्यांवरील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. एखादी कार दरीत कोसळून २४ तास उलटल्यानंतरही प्रशासनाला याची माहिती न मिळणे धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

### आरक्षण अंमलबजावणीसाठी विशेष प्रशिक्षण

## ५ हजार सहायक प्राध्यापक भरतीला मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक पदभरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने सहायक प्राध्यापक संवर्गातील एकूण पाच हजार १२ रिक्त पदांच्या भरतीला मंजुरी दिली असून, आरक्षण धोरणाची अचूक अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून स्वायत्त महाविद्यालयांमध्ये, तर २०२४-२५ पासून सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न इतर महाविद्यालयांमध्ये सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशांनुसार महाविद्यालयांतील रिक्त सहायक प्राध्यापक पदे भरणे आवश्यक झाले होते. त्यानुसार राज्य शासनाने पाच हजार १२ रिक्त पदांच्या भरतीला मंजुरी दिली. भरती प्रक्रियेत सामाजिक आणि समांतर आरक्षण धोरणाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेत एक दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक आणि उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी कोल्हापूर विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, नाशिक महसूल विभागीय कार्यालयाचे सहाय्यक महसूल अधिकारी संदीप पाटील, पुणे महसूल विभागीय कार्यालयाचे सहाय्यक महसूल अधिकारी इक्बाल दरवाजकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. दिलीप भरड, उच्च शिक्षण संचालनालयाच्या सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे आणि प्रशासन अधिकारी डॉ. सुयश दुसाने आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये पदभरतीसाठी आवश्यक बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी, सामाजिक आरक्षणासोबत महिला आणि दिव्यांगांसाठी असलेल्या समांतर आरक्षणाची अचूक अंमलबजावणी, तसेच आरक्षण धोरणातील तांत्रिक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

### योगी सरकारचे कडक निर्देश

**लखनौ** : बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर योगी आदित्यनाथ सरकारने उत्तर प्रदेशात कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सार्वजनिक ठिकाणी प्राण्यांची कुर्बानी तसेच रस्त्यावर नमाज अदा करण्यास स्पष्टपणे बंदी घालण्यात आली असून, जिल्हा प्रशासन आणि पोलिसांना कठोर अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कायदा व सुव्यवस्था आढावा बैठकीत निर्देश देताना सांगितले की, सर्व धार्मिक विधी पारंपरिक आणि अधिकृत ठिकाणीच पार पडले पाहिजेत. सार्वजनिक चौक किंवा खुल्या जागांवर नमाज किंवा कुर्बानीला परवानगी दिली जाणार नाही.

## विदेश वारीवर भारतीयांच्या खर्चात घट

### रुपयावरील दबाव आणि पश्चिम आशियातील तणावाचा परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीयांनी परदेश प्रवासावरील खर्चात लक्षणीय कपात केल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीतून समोर आले आहे. मार्च २०२६ मध्ये परदेश प्रवासासाठी भारतीयांनी केलेली रेमिटन्स सुमारे १.९ अब्ज डॉलर्सवर घसरली असून, फेब्रुवारीच्या तुलनेत यात २१२ दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक घट नोंदवण्यात आली आहे.

आरबीआयच्या 'लिबरलाइज्ड रेमिटन्स स्कीम' अंतर्गत परदेशात पाठवण्यात येणाऱ्या निधीत प्रवासाचा हिस्सा सर्वाधिक असला तरी, वाढते कच्चे तेल दर, पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती आणि रुपयावरील सततचा दबाव यामुळे भारतीयांनी परदेश प्रवासावर नियंत्रण आणल्याचे स्पष्ट होत आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारतीयांचा एकूण परदेशी चलन खर्चही कमी झाल्याचे दिसून आले आहे. आरबीआयच्या आकडेवारीनुसार, एलआरएस अंतर्गत एकूण आउटवर्ड रेमिटन्स सुमारे २९ अब्ज डॉलर्सवर घसरले असून, मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत त्यात सुमारे २ टक्क्यांची घट झाली आहे. विशेष म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच नागरिकांना परदेश प्रवास, डेस्टिनेशन वेडिंग आणि अनावश्यक आयात टाळण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर उद्योग क्षेत्रातही खर्च नियंत्रणाचे संकेत दिसू लागले आहेत. अनेक कंपन्यांनी परदेश दौरे कमी करण्यास आणि 'वर्क फ्रॉम होम'चा वापर वाढवण्यास सुरुवात केली आहे. एलआरएस योजनेअंतर्गत भारतीय नागरिकांना दर आर्थिक वर्षात २.५ लाख अमेरिकन डॉलर्सपर्यंत रक्कम परदेशात पाठवण्याची मुभा आहे. शिक्षण, पर्यटन, गुंतवणूक, वैद्यकीय उपचार आणि भेटवस्तू यांसाठी ही सुविधा वापरली जाते.

### ख्यमंत्री सिद्धरामय्या यांना काँग्रेस हायकमांडने दिल्लीला बोलावल्याने

## कर्नाटकात नेतृत्वबदलाच्या चर्चांना पुन्हा उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू** : कर्नाटकातील काँग्रेस सरकारमध्ये नेतृत्वबदलाच्या चर्चांना पुन्हा एकदा वेग आला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना काँग्रेस हायकमांडने दिल्लीला बोलावल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. २०२३ मध्ये काँग्रेस सरकार स्थापन झाल्यापासून मुख्यमंत्रीपदाच्या संभाव्य बदलाचा मुद्दा सातत्याने चर्चेत राहिला असून, या बैठकीमुळे त्याला पुन्हा खतपाणी मिळाले आहे.



सिद्धरामय्या यांनी स्वतः दिल्ली दौऱ्याची माहिती देताना सांगितले की, काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी त्यांना बैठकीसाठी बोलावले आहे. "मला दिल्लीला बोलावण्यात आले आहे. मात्र बैठकीचा विषय काय आहे, हे अद्याप माहिती नाही. मंगळवारी सकाळी अकरा वाजता बैठक होणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनीही सावध भूमिका घेतली. काँग्रेसचे प्रभारी रणदीप सिंह सुरजेवाला यांचा उल्लेख करत ते म्हणाले, "पक्षाने बोलावले तर मी दिल्लीला जाईन. नेतृत्वबदलावर भाष्य करणे हे माझे काम नाही."

२०२३ च्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यात जोरदार रस्सीखेच झाली होती. त्यावेळी 'रोटेशनल मुख्यमंत्री' पदाचा अनौपचारिक फॉर्म्युला असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. काँग्रेसने अधिकृतपणे असा कोणताही करार मान्य केला नसला, तरी या चर्चांना पूर्णविराम कधीच मिळाला नाही.

सिद्धरामय्या यांच्याकडे सामाजिक समीकरणांचा मजबूत जनाधार आणि प्रशासनाचा मोठा अनुभव असल्याचे मानले जाते, तर डी. के. शिवकुमार यांनी संघटन कौशल्य, निधी उभारणी आणि पक्षाला एकत्र ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. अखेरीस काँग्रेस नेतृत्वाने सिद्धरामय्या यांची मुख्यमंत्रीपदी निवड केली, तर शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले.

गेल्या काही महिन्यांत नेतृत्वबदलाच्या चर्चांना वेळोवेळी उधाण येत राहिले आहे. शिवकुमार समर्थक आमदारांनी "दिलेल्या वचनांची पूर्तता" करण्याचा मुद्दा वारंवार उपस्थित केला आहे. मात्र सिद्धरामय्या समर्थकांनी हे दावे फेटाळून लावत मुख्यमंत्री पूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करतील, असा विश्वास व्यक्त केला आहे. स्वतः सिद्धरामय्या यांनीही अनेकदा आपण पूर्ण कार्यकाळासाठी मुख्यमंत्री राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. "मुख्यमंत्रीपदासाठी कोणतीही जागा रिक्त नाही," असे विधान त्यांनी काही महिन्यांपूर्वी केले होते.

राजकीय विश्लेषकांच्या मते, दिल्लीतील ही बैठक काँग्रेससाठी अत्यंत महत्त्वाच्या काळात होत आहे. दक्षिण भारतातील काँग्रेसचे सर्वात मोठे सरकार कर्नाटकमध्ये असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षातील गटबाजी नियंत्रणात ठेवणे हायकमांडसाठी मोठे आव्हान ठरत आहे.

## पुण्यात अग्रेको इंडियाची ४०० कोटींची गुंतवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्य शासन आणि अग्रेको इंडिया यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे पुण्यात पुढील दहा वर्षांत सुमारे ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून एक हजारांहून अधिक थेट रोजगार निर्माण होणार आहेत.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमाला अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगण, गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अग्रेको इंडियाचे संचालक सन्नी ठकरार, ग्रुप प्रमुख स्टीफन रेआ, व्यवस्थापकीय संचालक राहुल खरे, सुनील देशमुख, मार्क बिरेल आणि प्रतीक्षा क्षीरसागर उपस्थित होते.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "पुणे आता ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्सचे महत्त्वाचे केंद्र बनत आहे. अशा परिस्थितीत अग्रेको कंपनीचे महाराष्ट्रात स्वागत आहे. कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळण्याबरोबरच आवश्यक सर्व प्रशासकीय सहकार्य दिले जाईल."

या करारानुसार पुणे जिल्ह्यातील फुलगाव येथे अत्याधुनिक जागतिक अभियांत्रिकी आणि उत्पादन केंद्र उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे काम याच वर्षात सुरू होणार असून, स्कॉटलंडबाहेरील अग्रेकोचे हे सर्वात महत्त्वाचे जागतिक अभियांत्रिकी व उत्पादन केंद्र ठरणार आहे.

## संपादकीय

### सुधारणांचे नवे आवर्तन




**आर्थिक विकासदराची गती संथ होत असतानाच वाढत्या वित्तीय तुटीमुळे देशाची अर्थव्यवस्था पुन्हा एकदा एका नाजूक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. अशा वेळी जुन्या आणि अकार्यक्षम अनुदानांची पुनर्रचना करून नव्या धाडसी आर्थिक सुधारणा हाती घेणे, हाच देशाच्या दीर्घकालीन आर्थिक स्थैर्याचा एकमेव मार्ग ठरू शकतो.**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रवासाकडे पाहिल्यास एकोणीसशे एक्क्याण्णव हे वर्ष एका मोठ्या आर्थिक संकटाचे आणि त्यातूनच जन्मलेल्या धाडसी आर्थिक सुधारणांचे मैलाचा दगड मानले जाते. आज साधारण साडेतीन दशकांनंतर, देश पुन्हा एकदा एका अशा वळणावर उभा आहे जिथे आर्थिक धोरणांचा गंभीर फेरविचार करणे अपरिहार्य बनले आहे. सध्या देशाचा आर्थिक विकासदर एका पातळीवर स्थिरावला असला, तरी वाढती वित्तीय तूट, महसुली उत्पन्नातील संथ वाढ आणि अनुदानांवर होणारा अवाढव्य खर्च यामुळे अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत रचनेवर मोठा ताण पडू लागला आहे. जागतिक बाजारातील अस्थिरता आणि भू-राजकीय तणावाचे सावट यामुळे कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये होणारे चढउतार देशाच्या तिजोरीची परीक्षा पाहत आहेत. अशा परिस्थितीत भारताला आपल्या आर्थिक धोरणांमध्ये मूलभूत आणि संरचनात्मक बदल करावे लागतील. या आर्थिक ताणाचे मुख्य कारण देशाच्या महसुली खर्चाच्या आणि अनुदानाच्या वाटपात दडले आहे. गेल्या काही वर्षांत राजकीय फायद्यासाठी किंवा तात्कालिक मलमपट्टी म्हणून अन्न, खते आणि इंधनावरील अनुदानांचा भार प्रचंड वाढला आहे. जनकल्याणकारी योजना आणि गरजू घटकांना थेट मदत देणे हे लोकशाही सरकारचे कर्तव्य असले, तरी या अनुदानांचे स्वरूप लक्ष्यवेधी असणे गरजेचे आहे. सरकारी तिजोरीतील मोठा निधी अनुदानांवर खर्च होतो, तेव्हा रस्ते, रेल्वे, बंदरे, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या पायाभूत सुविधांमधील दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी भांडवल कमी पडते. ही परिस्थिती देशाच्या भावी औद्योगिक आणि आर्थिक विकासाच्या गतीला लगाम लावणारी ठरू शकते. देशांतर्गत बाजारपेठेत खासगी गुंतवणुकीचा ओघ अद्यापही अपेक्षेप्रमाणे वाढलेला नाही. कॉर्पोरेट क्षेत्राचा नफा सुधारला असला, तरी नवीन उद्योग सुरू करण्यासाठी किंवा क्षमता वाढवण्यासाठी उद्योगजगत अजूनही सावध पवित्रा घेत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जमीन संपादन, कामगार कायदे आणि लालफितीचा कारभार यांमधील गुंतागुंत अजूनही पूर्णपणे संपलेली नाही. भारताला जागतिक पुरवठा साखळीमध्ये चीनला भक्कम पर्याय म्हणून उभे राहायचे असेल, तर देशांतर्गत व्यावसायिक वातावरण अधिक सुलभ आणि पारदर्शक करावे लागेल. उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनांसारख्या अनुदानांवर अवलंबून न राहता, उद्योगांना स्पर्धात्मक बनवण्यासाठी त्यांच्यावरील करांचा आणि प्रशासकीय मंजुऱ्यांचा भार कमी करणे आवश्यक आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताला एक नवा एकोणीसशे एक्क्याण्णवचा क्षण म्हणून या परिस्थितीकडे पाहावे लागेल. तत्कालीन सरकारने दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरून देशाला वाचवण्यासाठी आर्थिक उदारीकरणाचे धाडसी निर्णय घेतले होते. आज देशाला दिवाळखोरीची भीती नसली, तरी मध्यम गतीच्या विकासाच्या सापळ्यात अडकण्याचा धोका नक्कीच आहे. हा धोका टाळण्यासाठी शेती क्षेत्रातील सुधारणांना गती द्यावी लागेल. शेतीवरील सरकारी अनुदानांचे रूपांतर थेट तंत्रज्ञान, शीतगृहे आणि सिंचन व्यवस्थेतील गुंतवणुकीत करणे गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन त्यांचे उत्पन्न शाश्वत होईल आणि सरकारवरील अनुदानाचा भारही हलका होईल. महसुली तूट आटोक्यात ठेवण्यासाठी कर रचनेचे सुलभीकरण करणे आणि कर गोळा करण्याची व्याप्ती वाढवणे आवश्यक आहे. प्रामाणिक करदात्यांवर अधिक बोजा न टाकता, कर चुकवेगिरीला आळा घालणे आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचा वापर वाढवणे हाच यावर योग्य तोडगा आहे. यासोबतच, सरकारी कंपन्यांमधील निर्गुंतवणुकीच्या धोरणाला अधिक गती देऊन तिथून उभा राहणारा निधी केवळ चालू खर्च भागवण्यासाठी न वापरता, देशाच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठीच वापरला गेला पाहिजे. भारताच्या आर्थिक ताळेबंदाला आता एका नव्या शस्त्रक्रियेची गरज आहे. ही सुधारणांची प्रक्रिया राजकीय दृष्ट्या कठीण आणि आव्हानात्मक असू शकते, कारण अनुदानांना कात्री लावणे किंवा कठोर आर्थिक निर्णय घेणे कोणत्याही सरकारसाठी सोपे नसते. केंद्र सरकारने आता राजकीय गणितांच्या पलीकडे जाऊन, आर्थिक शहाणपणाला प्राधान्य देण्याची वेळ आली आहे. या नव्या आवर्तनात जे निर्णय घेतले जातील, त्यावरच आगामी दोन दशलकांतील भारताचे जागतिक अर्थव्यवस्थेतील स्थान निश्चित होणार आहे, हाच या बदलत्या काळाचा मुख्य संदेश आहे.

# रुपयाचा ताळेबंद आणि नवे आर्थिक वादळ



आन्तरराष्ट्रीय अर्थकारणात सध्या जे भू-राजकीय भूकंप होत आहेत, त्याचे थेट धक्के भारताच्या परकीय व्यवहारांच्या ताळेबंदाला बसू लागले आहेत. मध्यपूर्वेतील वाढता तणाव आणि विशेषतः जागतिक तेल व्यापाराची मुख्य वाहिनी असलेल्या होर्मुजच्या सामुद्रधुनीभोवती आवळला जाणारा युद्धाचा फास, यामुळे कच्च्या तेलाच्या किमती पुन्हा एकदा अस्थिर झाल्या आहेत. भारतासारख्या विकसनशील देशासाठी ही अत्यंत चिंतेची बाब आहे, कारण आपण आपल्या गरजेच्या ऐंशी टक्क्यांहून अधिक खनिज तेल आयात करतो. तेल महाग झाले की देशातून डॉलर्सचा ओघ वेगाने बाहेर पडतो, ज्यामुळे चालू खात्यातील तूट वाढते आणि त्याचा थेट फटका भारतीय रुपयाला बसतो. डॉलरच्या तुलनेत रुपयाची होणारी घसरण केवळ एका चलनाचा कमकुवतपणा दर्शवत नाही, तर ती संपूर्ण देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर आयातित महागाईचे संकट ओढवून आणते.

हा प्रश्न तेलाच्या आयातीपुरता मर्यादित नाही, तर तो परकीय भांडवलाच्या प्रवाहाशीही जोडलेला आहे. जागतिक बाजारात जेव्हा जेव्हा अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होते, तेव्हा आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांमधून आपला पैसा काढून घेतात आणि तो अमेरिकन रोख्यांसारख्या सुरक्षित ठिकाणी गुंतवण्यास पसंती देतात. या भांडवली पळवाटीमुळे देशांतर्गत वित्तीय बाजारात डॉलरची टंचाई निर्माण होते. रिझर्व्ह बँक आपल्या परकीय चलन गंगाजळीतून बाजारात डॉलर विकून रुपयाला तात्पुरता आधार देण्याचा प्रयत्न नक्कीच करते, परंतु हा उपाय कायमस्वरूपी असू शकत नाही. चलन साठ्याचा वापर करून रुपयाची घसरण काही काळ रोखता आली, तरी ताळेबंदातील मूळ त्रुटी दूर झाल्याशिवाय चलनाला शाश्वत स्थैर्य लाभत नाही, हे विसरून चालणार नाही.

या आव्हानात्मक परिस्थितीत भारतासाठी सर्वांत मोठा आणि भक्कम बचावाचा मार्ग म्हणजे आपली निर्यात वाढवणे हाच आहे. मात्र, जागतिक बाजारपेठेतील मंदी आणि विम्याचा वाढलेला खर्च यामुळे भारताच्या वस्तू निर्यातीला मर्यादा येत आहेत. सुदेवाने, भारताचे सेवा क्षेत्र आणि अनिवासी भारतीयांकडून देशात पाठवला जाणारा पैसा अजूनही भक्कम स्थितीत आहे. या दोन घटकांनी गेल्या काही तिमाहींमध्ये भारताच्या ताळेबंदाला मोठ्या पडझडीपासून वाचवले आहे. परंतु, जर जागतिक संघर्ष अधिक काळ रेंगाळला आणि आखाती देशांमधील आर्थिक गणिते बिघडली, तर तिथून येणाऱ्या परकीय चलनावरही विपरित परिणाम होऊ शकतो. त्यामुळे केवळ सेवा क्षेत्राच्या बळावर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा गाडा हाकणे दीर्घकाळासाठी जोखमीचे ठरेल.

या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी देशाला आपल्या धोरणांमध्ये काही महत्त्वाचे आणि मूलभूत बदल करावे लागतील. पहिल्या टप्प्यावर, परकीय थेट गुंतवणुकीला अधिक आकर्षित करण्यासाठी

> » जागतिक पातळीवरील संघर्षांमुळे तेलाच्या किमती भडकण्याचा आणि परकीय भांडवल निसटण्याचा धोका वाढला असून, रुपयाचे मूल्य सावरताना परकीय व्यवहारांचा ताळेबंद सुरक्षित राखण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

देशांतर्गत व्यावसायिक वातावरण अधिक सुलभ करावे लागेल. अल्पकालीन गुंतवणूक जशी वेगाने येते, तशीच ती संकटकाळात वेगाने निघूनही जाते. याउलट, थेट गुंतवणूक ही देशात उद्योग, रोजगार आणि दीर्घकालीन स्थैर्य घेऊन येते. दुसऱ्या टप्प्यावर, निर्यात वाढवण्यासाठी पारंपरिक बाजारपेठांवर अवलंबून न राहता आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि नॉर्डिक देशांसारख्या नव्या दिशा शोधाव्या लागतील. आयात पर्यायीकरणाला गती देऊन, संरक्षण आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील देशांतर्गत उत्पादनाला अधिक बळ देणे गरजेचे आहे.

रुपयाचे मूल्य आणि देशाचा आर्थिक ताळेबंद हे जागतिक घडामोडींच्या वावटळीत सापडले आहेत. अशा वेळी रिझर्व्ह बँकेची चलन व्यवस्थापनाची कसरत आणि केंद्र सरकारचे वित्तीय धोरण यांच्यात उत्तम समन्वय असणे अपरिहार्य आहे. वित्तीय तूट नियंत्रणात ठेवणे, महागाईचा भडका उडू न देणे आणि त्याच वेळी आर्थिक विकासाचा वेग मंदावणार नाही याची काळजी घेणे, ही एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढली जाणारी लढाई आहे. बाह्य धक्क्यांना तोंड देण्याची क्षमता केवळ तात्पुरत्या आर्थिक मलमपट्टीतून येणार नाही; त्यासाठी भारताला आपली आर्थिक पायाभूत रचना अधिक मजबूत आणि लवचिक करावी लागेल. जागतिक अर्थकारणातील या वादळात जो देश स्वतःला आत्मनिर्भरतेच्या बळावर स्थिर ठेवेल, तोच या संकटातून तावूनसुलाखून बाहेर पडेल हाच धडा या निमित्ताने मिळतो आहे.

# नियोजनशून्य विकासकामांमुळे शहरात वाहतूक कोंडी

## कामांचे नियोजन फसल्याने सामान्यांना होतोय त्रास

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून शहरात विविध विकासकामे आणि अर्बन सिटीअंतर्गत प्रकल्प मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. मात्र, या कामांचे नियोजन अपुरे असल्याने शहरातील नागरिकांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून, “अंगापेक्षा बोंगा मोठा” अशी खोचक प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. महापालिकेचे बहुतांश प्रकल्प हे खरोखर जनहितासाठी आहेत की ठेकेदारांना पोसण्यासाठी, अशी चर्चा सध्या शहरात रंगली आहे.

शहरातील अनेक रस्त्यांवर विस्तृत पदपथ आणि अरुंद रस्ते अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनांची क्षमता कमी झाली असून, वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यातच विविध विकासकामांसाठी सुरू असलेले खोदकाम आणि लग्नसराईमुळे शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. सकाळी आणि सायंकाळी नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

सध्या शगुन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, मोरवाडी चौक, महावीर चौक, साई चौक तसेच पुण्याकडून काळेवाडीकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या मार्गांवर चारचाकी वाहनांचे अनधिकृत पार्किंग मोठ्या प्रमाणात होत असल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली आहे.

खराळवाडी, जामा मस्जिद परिसर, पिंपरी स्टेशन रोड, त्रैलोक्य स्मशानभूमी रस्ता तसेच संजय गांधीनगरसमोरील मार्गावर सुरू असलेल्या खोदकामांमुळे अनेक रस्त्यांवर एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. मात्र, वाहतूक सुरळीत राहावी यासाठी आवश्यक दिशादर्शक फलक, बॅरिकेड्स किंवा वाहतूक नियंत्रण यंत्रणा नसल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः बाहेरून येणारे वाहनचालक गोंधळून जात असून, त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा अधिक वाढत आहे. मॉलसमोरील अतिक्रमणे, अनधिकृत रिक्षा स्टँड, रस्त्यावर बसणारे फेरीवाले तसेच अनधिकृत पार्किंग यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. मेट्रो आणि इतर कारणांसाठी शहरात येणाऱ्या नागरिकांसाठी पुरेशा वाहनतळांची व्यवस्था करण्याची गरजही व्यक्त केली जात आहे.

विकासकामे सुरू करण्यापूर्वी वाहतूक व्यवस्था, पर्यायी मार्ग, वाहनतळ आणि अतिक्रमण नियंत्रण यांचे योग्य नियोजन होणे आवश्यक होते. मात्र, नियोजनातील कमतरतेमुळे शहरवासीयांना रोजच वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

शहरातील वाढती लोकसंख्या, वेगाने होणारा पुनर्विकास, अपुरी रस्ते क्षमता आणि अनियंत्रित वाढ यामुळे वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे वाहतूक सुरळीत करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आणि सक्षम नियोजनाची गरज असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## हिंजवडी मेट्रोत हरित तंत्रज्ञानाचा वापर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पात पर्यावरणपूरक आणि ऊर्जा बचतीवर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. सौर ऊर्जा आणि थर्ड रेल सिस्टीमच्या माध्यमातून मेट्रोच्या वार्षिक वीज खर्चात सुमारे २० कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

या मार्गावरील सर्व २३ उन्नत स्थानकांवर तसेच कार डेपोच्या छतांवर सौर ऊर्जा पॅनेल्स बसवण्यात येत आहेत. एकूण ११ मेगावॅटपेक्षा अधिक क्षमतेचे सोलर प्लांट उभारले जात असून, त्यातून निर्माण होणारी वीज स्थानकांवरील दिवे, लिफ्ट, एस्कलेटर आणि वातानुकूलित यंत्रणांसाठी वापरण्यात येणार आहे. ही यंत्रणा मुख्य वीज ग्रीडशी जोडण्यात येणार असल्याने विजेचा अधिक कार्यक्षम वापर शक्य होणार आहे. हा प्रकल्प रेस्को मॉडेलवर राबवण्यात येत असल्यामुळे पीएमआरडीएला प्रारंभी कोणताही भांडवली खर्च करावा लागलेला नाही. खासगी कंपनीने स्वतःच्या खर्चातून सौर यंत्रणा उभारून तिची देखभाल आणि व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारली आहे.

मेट्रोच्या डब्यांची निर्मिती हलक्या अ‍ॅल्युमिनियम धातूपासून करण्यात आली असून, त्यामध्ये री-जनरेटिव्ह ब्रेकिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे ब्रेक लावताना निर्माण होणारी अतिरिक्त वीज पुन्हा वापरणे शक्य होणार असून, ऊर्जा बचतीला मोठी मदत मिळणार आहे.

## महापालिकेची कागदोपत्री कारवाई?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ‘ब’ क्षेत्रीय कार्यालयाचा अजब कारभार समोर आला असून, प्रत्यक्ष जागेवर कारवाई न करता केवळ कागदोपत्री हालचाली करून वरिष्ठ अधिकारी आणि तक्रारदारांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. चिंचवड येथील सुवर्णदीप रेसिडेन्सीमधील अनधिकृत आणि वाढीव बांधकाम हटवण्याऐवजी केवळ ‘कारवाईचा देखावा’ सुरू असल्याचा गंभीर आरोप तक्रारदार सुवर्णा दिलीप पाटील यांनी केला आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र पाठवून संताप व्यक्त केला आहे.

सुवर्णा पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, जुलै २०२५ पासून सुवर्णदीप रेसिडेन्सीमधील बेकायदेशीर बांधकामाविरोधात सातत्याने तक्रारी, ई-मेल तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या जात आहेत. दरम्यान, २३ मार्च २०२६ रोजी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पाठवलेल्या ई-मेलमध्ये ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस बंदोबस्तात संबंधित बांधकामावर कारवाई करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. तसेच कारवाईचे फोटो व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवल्याचेही नमूद करण्यात आले. मात्र, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान ज्या अनधिकृत बांधकामाची नोंद केली होती, तेच बांधकाम आजही जागेवर कायम असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे “जर प्रत्यक्ष कारवाई झाली असेल, तर अनधिकृत बांधकाम अद्याप कसे उभे आहे? आणि व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवलेले फोटो नेमके कोणत्या इमारतीचे आहेत?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. ही कारवाई केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना दाखवण्यासाठीचा दिखावा आहे का, की तक्रारदारांची समजूत काढण्याचा प्रयत्न, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. सातत्याने पाठपुरावा करूनही बांधकाम परवाना विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयाकडून केवळ टाळाटाळ होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच संबंधित विकासकाने भोगवटा पत्रातील अटींची पूर्तता केलेली नसल्याचेही पाटील यांनी म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणामागे मोठे अर्थकारण दडले असल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून दोषी अधिकारी आणि बांधकाम परवाना विभागातील संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच सुवर्णदीप रेसिडेन्सीमधील अनधिकृत बांधकाम तातडीने हटवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

# वासुली फाटा परिसरात वादातून युवकाला मारहाण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पुणे :** वासुली फाटा परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून तिघांनी एका युवकाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत युवकाच्या बरगडीला फ्रॅक्चर झाले असून त्याला जीवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना २१ मे २०२६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास वासुली फाटा परिसरात घडली. याप्रकरणी पंकज विजयकुमार (वय ३४) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमोल एकनाथ राऊत, भाऊ ऊर्फ योगेश एकनाथ राऊत आणि एकनाथ राऊत या तिघांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे आपल्या मित्रासोबत मोटारसायकलवरून जात असताना रस्त्याच्या कडेला भाजी खरेदीसाठी थांबले होते. त्यावेळी आरोपींसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपींनी शिवीगाळ करत फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच एका आरोपीने लाकडी दांडक्याने हातावर वार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या मारहाणीत फिर्यादीच्या बरगडीला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले. तसेच “पुन्हा आमच्या नादी लागू नकोस, नाहीतर संपवून टाकू,” अशी धमकी आरोपींनी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

### पैशांच्या वादातून मारहाण

**पुणे :** चिखली परिसरात उसन्या पैशांच्या वादातून तिघांनी एका व्यक्तीवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहेत. ही घटना २२ मे २०२६ रोजी रात्री अकराच्या सुमारास मोरेवस्ती येथील महादेव मंदिराजवळ घडली. याप्रकरणी प्रविण नानासाहेब वाघमारे (वय ३८, रा. चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रविण वाघमारे हे त्यांचे मित्र अशोक कदम आणि गणेश चंदनशिवे यांच्यासह आरोपींकडे उसणे दिलेले पैसे मागण्यासाठी गेले होते. यावेळी आरोपी नितीन कानगुडे, प्रविण कानगुडे आणि जिजाबाई उगले यांनी फिर्यादी व त्यांच्या मित्रांना शिवीगाळ करत मारहाण केली. तक्रारीनुसार, आरोपी जिजाबाई उगले यांनी फिर्यादीच्या मानेला नखाने ओरखडे काढले. तर आरोपी नितीन कानगुडे याने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यात वार करून गंभीर जखमी केले.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चिखली पोलिस करत आहेत.

### जुगार अड्ड्यावर छापा

**पिंपरी :** पिंपरीतील विद्यानगर परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर संत तुकारामनगर पोलिसांनी छापा टाकून आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ८० हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यानगर येथील एका खोलीत काही जण पैसे लावून तीनपत्तीचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार शुक्रवारी सायंकाळी पोलिसांनी छापा टाकला. आरोपींकडून ३५ हजार ७५० रुपये रोख, ४५ हजार रुपयांचे तीन मोबाईल फोन तसेच जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये प्रतीक बाळकृष्ण बगाटे, उमेश सटवा सरवदे, किरण मारुती कांबळे, सलीम ऊर्फ खबुला मकबूल पटेल, इस्माईल गुलाब शेख, रोहित प्रभाकर शिंदे, सुरज विजय घोडके आणि आकाश युवराज रणखांबे यांचा समावेश आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

# जागेच्या वादातून महिलेला मारहाण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** चिंचवड परिसरात जागेच्या वादातून एका महिलेला मारहाण आणि दमदाटी केल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २० मे २०२६ रोजी दुपारी चारच्या सुमारास दळवीनगर, चिंचवड येथे घडली.

याप्रकरणी कविता पंढरीनाथ दळवी (वय ५१, रा. दळवीनगर, चिंचवड) यांनी चिंचवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आदित्य जगदीश शिंदे (वय १९), मनोज विठ्ठल शिंदे (वय ४२) आणि रत्नमाला विठ्ठल शिंदे (वय ६५, सर्व रा. दळवीनगर, चिंचवड) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या मालकीच्या जागेवर जुन्या घराच्या ठिकाणी आरोपी ताडपत्री टाकत होते. याबाबत विचारणा केली असता आरोपींनी फिर्यादींना शिवीगाळ करत मारहाण केली. आरोपी आदित्य याने फिर्यादींचा उजवा हात जोरात ओढून पिरगळल्याने त्यांच्या मनगटाला सूज आली आणि दुखापत झाली. तसेच आरोपी मनोज शिंदे याने “मी पत्रकार आहे, तुला आणि तुझ्या मुलाला बघून घेईन,” अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तिघांनी मिळून धक्काबुक्की करत मारहाण केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### उरुळी कांचन परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**उरुळी कांचन** : पूर्व हवेलीतील उरुळी कांचन पोलिस ठाण्याच्या हद्दीत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून चोरट्यांनी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. सोरतापवाडी गावातून ४५ हजार रुपये किमतीची ओला इलेक्ट्रिक स्कूटर चोरीला गेली असून, दुसऱ्या घटनेत उरुळी कांचन येथील एका अपार्टमेंटमध्ये प्रवेश करून चोरट्याने ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या दोन्ही प्रकरणांत उरुळी कांचन पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. पहिल्या घटनेत नवनाथ वैजनाथ घावटे (वय ५८, व्यवसाय – किराणा दुकान, मूळ रा. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांनी त्यांची लाल रंगाची ओला इलेक्ट्रिक स्कूटर सोरतापवाडी येथील बालाजी ट्रेडर्सच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. १६ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहा ते १७ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा या कालावधीत अज्ञात चोरट्याने एमएच १२ एक्सएस ८८४२ क्रमांकाची ४५ हजार रुपये किमतीची स्कूटर लॉक तोडून चोरून नेली. याप्रकरणी घावटे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस हवालदार जगताप करत आहेत. दुसरी घटना उरुळी कांचन शहरातील जय मल्हार रोड परिसरात घडली. जयराम बबरूवान मुंडे (वय २४, व्यवसाय – मेडिकल स्टोअर, मूळ रा. पहाडी पारगाव, ता. धारूर, जि. बीड) हे सध्या उरुळी कांचन येथील मुकिंदा हाईट्स इमारतीत राहतात. शुक्रवारी (दि. २२) सकाळी साडेआठच्या सुमारास त्यांच्या घराचा दरवाजा उघडा असताना चोरट्याने घरात प्रवेश केला. चोरट्याने दोन मोबाईल फोन आणि डेल कंपनीचा लॅपटॉप असा सुमारे ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी जयराम मुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भरदिवसा तसेच रात्रीच्या वेळी घरफोडी आणि वाहन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

### पिकांसह पोल्ट्री व्यवसायाचे मोठे नुकसान

# अवकाळीचा आंबेगाव तालुक्याला तडाखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : आंबेगाव तालुक्याच्या अनेक भागांत गुरुवारी ढगांच्या गडगडाटासह झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले असून शेतकरी आणि पोल्ट्री व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या या पावसामुळे तरकारी पिके, बाजरी, कांदा तसेच जनावरांच्या चारापिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

मे महिन्यात अचानक झालेल्या या अवकाळी पावसामुळे नदीकाठच्या गावांमधील उन्हाळी पिकांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः फ्लॉवर, टोमॅटो, मका, बाजरी आणि विविध भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी बाजरी काढणीची कामे सुरू केली असताना अचानक आलेल्या पावसामुळे शेतात ठेवलेली कणसे आणि वैरण पूर्णपणे भिजली असून त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच कांदाचाळीत साठवून ठेवलेला कांदा पावसाच्या पाण्यामुळे खराब होण्याची भीती निर्माण झाली आहे. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर त्यामुळे नव्या संकटाचे आव्हान उभे राहिले आहे. मंचर, अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, पिंपळगाव (खडकी), निरगुडसर, चांडोली, भराडी तसेच पूर्व पट्ट्यातील लोणी धामणी परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. लाखणगाव परिसरातील अनेक पोल्ट्री व्यावसायिकांच्या शेडची छपरे उडाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांचे आणि जनावरांच्या गोठ्यांचेही नुकसान झाल्याने नागरिकांचे संसार उघड्यावर आले आहेत. काही भागांत झाडे आणि विद्युत खांब कोसळल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि नागरिकांच्या अडचणी वाढल्या असून नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्याची मागणी होत आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे सरसकट पंचनामे करून तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, पोल्ट्री व्यावसायिक आणि घरांचे नुकसान झालेल्या नागरिकांना विशेष आर्थिक सहाय्य द्यावे, नुकसानग्रस्त रस्ते आणि सार्वजनिक सुविधांची त्वरित दुरुस्ती करावी तसेच पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना बियाणे आणि खतांवर विशेष अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने आंबेगाव तालुक्यातील शेतकरी चिंतेत असून शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

### पाणी शेतात शिरल्याने शेतकरी त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणाच्या डाव्या कालव्याच्या घोड शाखेला नुकतेच पाणी सोडण्यात आले आहे. हे पाणी नागापूर गावाच्या हद्दीत आल्यानंतर नेहमीप्रमाणे मिंडे वस्ती परिसरातील वितरिका क्रमांक ३ च्या अरुंद मोरीमुळे पाण्याचा निचरा न झाल्याने रविवारी (दि. २४) पाणी थेट शेतकऱ्यांच्या शेतात आणि वस्तीमध्ये शिरल्याची घटना घडली. या प्रकारामुळे स्थानिक शेतकरी संतप्त झाले असून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येत आहे.

घोड शाखेचे पाणी वितरिका क्रमांक ३ मार्गे नागापूर परिसरातील शेतीकडे सोडले जाते. मात्र, वितरिकेच्या मोरीतील पाइप अरुंद असल्याने त्यामध्ये कचरा, गवत आणि इतर अडथळे अडकतात. त्यामुळे पाण्याचा प्रवाह थांबून पाणी तुंबते आणि वितरिकेबाहेर पडून थेट शेतांमध्ये जाते. आतापर्यंत हा प्रकार चार वेळा घडल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले.

सध्या परिसरातील शेतकऱ्यांनी विविध पिकांची लागवड केली असून रविवारी वितरिकेचे पाणी शेतात घुसल्याने पिकांच्या नुकसानीची भीती निर्माण झाली होती. पाणी बाहेर काढण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागली. काही शेतकऱ्यांनी बांध फोडून पाण्याचा निचरा करण्याचा प्रयत्न केला.

याबाबत स्थानिक शेतकरी सोमनाथ मिंडे, प्रकाश मिंडे, अल्पेश मिंडे आणि तेजस मिंडे यांनी सांगितले की, “वितरिका क्रमांक ३ च्या मोरीचे पाइप अरुंद असल्यामुळे वारंवार ही समस्या निर्माण होत आहे. संबंधित विभागाने येथे तीन फुटी मोठे पाइप टाकल्यास पाण्याचा प्रवाह सुरळीत होईल आणि शेतात पाणी जाण्याचा प्रश्न कायमचा मिटेल.”

---

## गवारीला बाजारभाव नसल्याने नाराजी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या गवारीच्या पिकाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उन्हाळी हंगामात या भागात मोठ्या प्रमाणावर गवारीचे उत्पादन घेतले जाते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून गवारीला दहा किलोमागे केवळ ३०० ते ४०० रुपये इतकाच भाव मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

गवारीचे पीक काढणीसाठी अत्यंत मेहनतीचे मानले जाते. या पिकाची तोडणी कष्टदायक असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर महिला शेतमजुरांची आवश्यकता भासते. त्यामुळे मजुरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याशिवाय तोडणीनंतर बाजारपेठेत माल पोहोचवण्यासाठी वाहतुकीवरही मोठा खर्च करावा लागत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत आहे.

सध्या गवारीच्या विक्रीतून खर्च वजा जाता फारशी रक्कम शिल्लक राहत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. वाहतुकीचा खर्च कमी करण्यासाठी परिसरातील अनेक शेतकरी मंचर आणि नारायणगाव बाजारपेठेत गवारीचे २० किलोचे भारे दुचाकीवरून नेताना दिसत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची बिकट आर्थिक परिस्थिती स्पष्ट होत आहे.

थोरांदळे परिसरात यंदा पाण्याची कमतरता असतानाही अनेक शेतकऱ्यांनी धाडस करून गवारीचे पीक घेतले होते. मात्र, सध्याच्या कमी बाजारभावामुळे हे पीक परवडत नसल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.


याबाबत शेतकरी देवराम हनुमंत घुले म्हणाले, “कमी पाण्यात गवारीचे पीक घेतले. मेहनत आणि खर्चही मोठा झाला. मात्र, सध्या बाजारभाव अत्यंत कमी मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत आला आहे.”

---

# घोड धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव

### उन्हाळी आवर्तन बंद झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिरूर** : चिंचणी (ता. शिरूर) येथील घोड धरणातून डावा आणि उजवा कालवा मार्गे सुरू असलेले उन्हाळी आवर्तन यंदा उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असतानाच बंद करण्यात आले आहे. ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी उपयुक्त साठ्यातील पाणी राखीव ठेवण्याचे आदेश जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्यानंतर दोन्ही कालवे बंद करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे घोड धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

घोड शाखेचे अभियंता वैभव काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या घोड धरणात ०.१७७ टीएमसी इतका पाणीसाठा शिल्लक आहे. दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून एप्रिल महिन्यानंतर श्रीगोंदा आणि शिरूर तालुक्यातील लोकप्रतिनिधी घोड धरणाचे उन्हाळी आवर्तन पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यासाठी आग्रही राहत होते. उपयुक्त पाणीसाठा संपेपर्यंत शेतीसाठी पाणी वापरण्याची पद्धतच प्रचलित होती. मात्र, बदलत्या परिस्थितीमुळे यंदा प्रथमच वेगळा निर्णय घेण्यात आला आहे. घोड धरणावरून दोन्ही तालुक्यातील अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. जलजीवन मिशनअंतर्गत शेकडो कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजना उभारण्यात आल्या असून, त्यासाठी घोड धरणातून किती पाणी वापरले जाणार याचा आराखडा सुरुवातीपासूनच निश्चित करण्यात आला होता. घोड धरणाची एकूण साठवण क्षमता सुमारे पाच टीएमसी आहे. या धरणावरून रांजणगाव औद्योगिक वसाहत, रांजणगाव, कारेगाव परिसर तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा शहर, काष्टी आणि अन्य १५ ते २० गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना सुरू आहेत. शिरूर शहरासाठीची पाणीपुरवठा योजनाही घोड धरणावरून प्रस्तावित आहे. पिण्याच्या पाण्यासाठी वर्षभरात एक टीएमसीपेक्षा अधिक पाण्याचा वापर होत असला तरी टंचाईच्या काळात कुकडी प्रकल्पातून घोड धरणात पाणी सोडले जात नसल्याने घोडच्या लाभक्षेत्रातील शेतीवर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. त्यातच प्रस्तावित साकळाई योजनेमुळे घोड धरणातून आणखी १.८० टीएमसी पाणी उचलले जाणार असल्याने भविष्यात शेतीसाठी उपलब्ध पाण्याचे प्रमाण आणखी कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी वर्षभर मोठ्या प्रमाणात पाणी आरक्षित ठेवावे लागत असल्याने घोड धरणाच्या एकूण साठ्यातून केवळ सव्वादोन टीएमसी पाणीच शेतीसाठी उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे भविष्यात घोड धरणाच्या लाभक्षेत्रातील शेती आणि पाणी व्यवस्थापनावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याच कारणामुळे साकळाई प्रकल्पाला मोठ्या प्रमाणावर विरोध होत असल्याचे चित्र आहे.

---

## महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा समारोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**जुन्नर** : ग्रामीण भागातील महिलांना सक्षम आणि स्वावलंबी बनवण्यासाठी तसेच त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जुन्नर तालुक्यात विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून निमगाव तर्फे महाळुंगे येथे डिसेंट फाउंडेशन, हायस्पीड स्किल हब आणि स्व. नंदकुमार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ४० दिवसीय मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा समारोप उत्साहात पार पडला.

ग्रामीण भागातील महिलांना शेती आणि मजुरीला पूरक असा व्यवसाय सुरू करता यावा, या उद्देशाने प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. या ४० दिवसांच्या कालावधीत महिलांना ब्लाऊजचे विविध आधुनिक प्रकार, मुलींचे ड्रेस, परकर, लहान मुलांचे फ्रॉक, फॅन्सी झगे यांचे शिवणकाम शिकविण्यात आले. तसेच शिलाई मशीनची किरकोळ दुरुस्ती व देखभाल याबाबतही तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे आणि उद्यम आधार कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी आतार परिवार यांच्या वतीने आई-वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुजाता चंद्रकांत भगत आणि जयश्री अजित धोंडकर या गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन भेट देण्यात आल्या.

समारोप कार्यक्रमाला स्व. नंदकुमार फाउंडेशनचे सेक्रेटरी अरुण पारखे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र बिडवई, हायस्पीड स्किल हबचे प्रमुख दिलीप भगत, डिसेंट फाउंडेशनचे सेक्रेटरी डॉ. फकीर आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, मुख्याध्यापक भरत बोचरे, प्रशिक्षक शितल पवार, प्रसिद्ध निवेदक मेघनाथ जाधव आणि अक्षय कुटे यांच्यासह ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप भगत यांनी केले, तर सूत्रसंचालन मेघनाथ जाधव यांनी केले. शेवटी डिसेंट फाउंडेशनचे अध्यक्ष जितेंद्र बिडवई यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## लोणी काळभोर परिसरात एअरटेलची सेवा ठप्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर** : लोणी काळभोरसह परिसरात रविवारी (दि. २४) दुपारपासून एअरटेल मोबाईल कंपनीची नेटवर्क सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली असून मोबाईलला रेंज येत नसल्याने कॉलिंग आणि इंटरनेट सेवा ठप्प झाली आहे.

ऐन कामाच्या वेळेत नेटवर्क गायब झाल्याने नोकरदार, व्यावसायिक आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून कंपनीच्या सेवेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

नेटवर्क समस्येमुळे कॉल ड्रॉप होणे, आवाज स्पष्ट न ऐकू येणे तसेच फोन दुसऱ्याच क्रमांकावर लागण्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. पूर्व हवेली परिसरात एअरटेलची सेवा विस्कळीत झाल्याने या नेटवर्कवर अवलंबून असलेल्या अनेक सुविधा प्रभावित झाल्या आहेत.

आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन हा दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. बँक व्यवहारांपासून किराणा दुकानातील पेमेंटपर्यंत बहुतांश व्यवहार इंटरनेटवर अवलंबून आहेत. मात्र, एअरटेलचे इंटरनेट पूर्णपणे बंद पडल्याने गुगल पे, फोन पे यांसारख्या यूपीआय सेवा देखील ठप्प झाल्या आहेत.

खरेदीसाठी गेलेल्या नागरिकांना ऑनलाइन पेमेंट करता येत नसल्याने व्यापारी आणि ग्राहकांचे व्यवहार खोळंबले आहेत. त्यामुळे नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. एअरटेल कंपनीने मोठ्या प्रमाणावर ग्राहक जोडले असले तरी वारंवार खंडित होणाऱ्या सेवेने ग्राहकांचा संयम सुटू लागल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

---

## यांत्रिकीकरणामुळे विहिरी खोदाईला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या विहिरी खोदाईची कामे अंतिम टप्प्यात आली असून, यांत्रिकीकरणामुळे ही कामे अधिक जलद, सोपी आणि सुलभ झाली आहेत. पोकलेन आणि जेसीबीसारख्या आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर नवीन विहिरी खोदणे तसेच जुन्या विहिरींचे खोलीकरण करण्याची कामे करत आहेत. त्यामुळे कमी वेळेत मोठी कामे पूर्ण होत असून शेतकऱ्यांचा कल आधुनिक यंत्रसामग्रीकडे वाढताना दिसत आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकरी पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी विहिरींची कामे हाती घेतात. उन्हाळ्यात भूजल पातळी कमी होत असल्याने नवीन विहिरी खोदणे, जुन्या विहिरींची खोली वाढविणे तसेच गाळ काढण्याची कामे मोठ्या प्रमाणावर केली जातात. पूर्वी ही सर्व कामे मजुरांच्या सहाय्याने केली जात होती. विहिरी खोदण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागत असे आणि अनेकदा ही कामे पूर्ण होण्यासाठी दीर्घ कालावधी लागत होता. मात्र, गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात यांत्रिकीकरणाचा वेगाने प्रसार झाला आहे.

पोकलेन आणि जेसीबीसारखी अवजड यंत्रे गावोगावी सहज उपलब्ध होत असल्याने विहिरींची खोदाई अत्यंत कमी वेळेत पूर्ण केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ वाचत असून मजुरांवरील ताणही कमी झाला आहे.

सध्या शेतकरी २० बाय ५० आकाराच्या विहिरींची खोदाई पोकलेनच्या सहाय्याने करत असून, अशा एका विहिरीसाठी सुमारे चार लाख रुपयांपर्यंत खर्च येत असल्याचे सांगितले जात आहे. खर्च मोठा असला तरी कामाचा वेग, कमी कालावधी आणि जलद परिणाम यामुळे शेतकरी या यंत्रसामग्रीला अधिक पसंती देत आहेत.

यांत्रिकीकरणामुळे ग्रामीण भागातील शेतीपूरक कामांमध्ये मोठे बदल होत असून विहिरी खोदाईची पारंपरिक पद्धत मागे पडताना दिसत आहे.

आधुनिक यंत्रांच्या वापरामुळे शेतकऱ्यांना वेळेत पाण्याची सुविधा उपलब्ध होण्यास मदत होत असून, भविष्यात अशा यंत्रांचा वापर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

### अंमलबजावणी २५ मे पासून होणार; अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांची माहिती

# भीमाशंकर कारखान्याचे ऊस लागवड धोरण जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर** : दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने हंगाम २०२६-२७ साठीचे ऊस लागवड धोरण जाहीर केले असून, या धोरणाची अंमलबजावणी २५ मेपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली. माजी सहकारमंत्री तथा कारखान्याचे संस्थापक-संचालक दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाने हा निर्णय घेतला आहे.

बेंडे यांनी सांगितले की, २५ मे २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत को.एम. ०२६५ या ऊस जातीच्या लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. तसेच २५ मे २०२६ ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीत को. ८६०३२, १ ऑगस्ट २०२६ ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीत व्ही. एस.आय. ०८००५, तर १ सप्टेंबर २०२६ ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीत एम.एस. १०००१ आणि फुले ९०५७ या ऊस जातींच्या लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. याशिवाय १ जून २०२६ ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीत को.व्ही.एस.आय. १८१२१, फुले ऊस १५०१२, फुले ऊस १५००६, फुले ऊस १३००७ आणि को.एम. ११०८२ या ऊस जातींच्या लागवडीस मान्यता देण्यात आली आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद आणि ऊस उत्पादकांना उपलब्धतेनुसार २५ मेपासून ऊस बेण्यांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच २५ जून २०२६ पर्यंत लागवड केलेल्या ऊस रोपांची नोंद २५ मे २०२६ अशी ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्यानंतर रोपांपासून लागवड झालेल्या उसाची नोंद एक महिना अगोदर करण्यात येईल. खासगी ऊस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी चार दिवसांच्या आत संबंधित गट कार्यालयात जाऊन नोंद करणे आवश्यक राहणार आहे. ऊस उत्पादकांनी लागवडीसाठी आवश्यक ७/१२ उतारा आणि इतर कागदपत्रे संबंधित विभागीय शेतकी कार्यालयात जमा करून बेणे मागणी नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

‘दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील ऊस उत्पादकता वाढ लक्ष २०२०’ या योजनेअंतर्गत माती परीक्षण, ताग बियाणे वाटप, ऊस बेणे, रासायनिक खते, द्रवरूप जीवाणू खते, ऊस रोपे, खासगी ऊस लागवड अर्थसहाय्य, प्रेसमड, ठिबक सिंचन योजना तसेच विविध सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि जैविक कीटकनाशकांचा पुरवठा करण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी डिसेंबर २०२६ अखेर १०० रुपये प्रवेश शुल्क भरून नावनोंदणी करावी, असेही सांगण्यात आले.

---

## इंधन बचतीचा दिला संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : येथील सायकल दुरुस्ती आणि विक्री व्यवसाय करणारे घनश्याम किसन रोकडे यांनी वाढत्या इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर तसेच आरोग्य संवर्धनाचा संदेश देण्यासाठी दुचाकीचा वापर बंद करून सायकलचा स्वीकार केला आहे. दररोज आठ ते दहा किलोमीटरचा प्रवास सायकलवरून करत त्यांनी “सायकल चालवा, पेट्रोल वाचवा” असा संदेश समाजाला दिला आहे.

घनश्याम रोकडे हे मूळचे काठापूर बुद्रुक येथील असून गेल्या चाळीस वर्षांपासून ते सायकल दुरुस्ती आणि विक्री व्यवसाय करत आहेत. सध्या पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित बिघडत आहे. इंधन तुटवड्याची शक्यता आणि वाढता खर्च लक्षात घेऊन त्यांनी दुचाकीऐवजी पुन्हा सायकलकडे वळण्याचा निर्णय घेतला. वयाची ५७ वर्षे पूर्ण केल्यानंतरही रोकडे दररोज आपल्या कामानिमित्त आठ ते दहा किलोमीटरचा प्रवास सायकलवरून करतात. त्यांच्या मते, सायकल चालवल्यामुळे इंधनाची बचत होतेच, शिवाय संपूर्ण शरीराचा उत्तम व्यायामही होतो. आजच्या धकाधकीच्या जीवनात लोकांचे शारीरिक श्रम कमी झाले असून अनेक आजार वाढत आहेत. अशा परिस्थितीत सायकलचा वापर हा आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले.

## सारांश वृत्त

### लॉरी उलटल्याने १५ जणांचा मृत्यू

**ढाका:** बांगलादेशच्या मध्यवर्ती भागातील एका प्रमुख महामार्गावर सोमवारी पहाटे लोखंडी सळ्यांनी भरलेला एक लॉरी उलटल्याने किमान १५ जणांचा मृत्यू झाला आणि १० जण जखमी झाले. वायव्य बांगलादेशाला मध्य भागाशी जोडणाऱ्या यमुना पुलाच्या पूर्वेकडील बाजूस हा अपघात घडला, अशी माहिती स्थानिक अग्निशमन केंद्राचे प्रभारी, अताउर रहमान यांनी पत्रकारांना दिली. त्यांनी सांगितले की, आजूबाजूच्या परिसरातील लोकांच्या मदतीने १० जखमींना उपचारासाठी स्थानिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आले.

### मध्य प्रदेशात विवाह रॅकेटचा पर्दाफाश

**देवास** : देवासमध्ये एका सामूहिक विवाह सोहळ्यात अनाथाश्रमातील महिलांशी लग्न लावून देण्याचे आमिष दाखवून ४२ नवरदेव आणि त्यांच्या कुटुंबीयांची फसवणूक करणाऱ्या एका जोडप्याला अटक करून मध्य प्रदेश पोलिसांनी एका विवाह रॅकेटचा पर्दाफाश केला आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. अटक करण्यात आलेले आरोपी मुकेश आणि सुनिता दास बैरागी यांच्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार असलेल्या इतर दोघांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

### रस्ते अपघातात १७ जणांचा मृत्यू

**पेशावर** : पाकिस्तानच्या वायव्य भागात सोमवारी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मोटारबसला भरधाव वेगाने येणाऱ्या बसने धडक दिल्याने किमान १७ जणांचा मृत्यू झाला आणि पाच जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. हा अपघात मरदान जिल्ह्यातील स्वात द्रुतगती मार्गावर घडला. पोलिसांच्या माहितीनुसार, यांत्रिक बिघाडामुळे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुसऱ्या बसला प्रवासी बसची धडक बसली. या अपघातात किमान १७ जणांचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत.




## सामान्यांची ही लूट असल्याचा केला आरोप

# इंधन दरवाढीवर खर्गे यांचा केंद्रावर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेल्या ताज्या वाढीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सोमवारी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. "इंधन लुटीचा रोजचा हल्ला अजून संपलेला नाही," असे म्हणत त्यांनी या "रोजच्या लुटीचा फायदा नेमका कोणाला होत आहे?" असा सवाल उपस्थित केला.






पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या किमती वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांनी सोमवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर २.६१ ते २.७१ रुपयांची वाढ केली. गेल्या दोन आठवड्यांतील ही चौथी दरवाढ आहे.

एक्सवरील पोस्टमध्ये खर्गे म्हणाले, "१० दिवसांत चौथ्यांदा इंधन दरवाढ करण्यात आली आहे. पेट्रोल ७.३५ रुपये प्रति लिटर आणि डिझेल ७.५३ रुपये प्रति लिटरने महाग झाले आहे. मोदी सरकारने सर्वसामान्यांच्या बचतीवर पेट्रोल शिंपडले आहे."

खर्गे यांनी दावा केला की, यूपीए सरकारच्या काळात आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती १७५.३४ टक्क्यांनी वाढल्या होत्या. मात्र, मोदी सरकारच्या काळात आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमतीत एक टक्काही वाढ झालेली नाही. तरीदेखील पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. "२०१४ मध्ये पेट्रोलचा दर ७१.४१ रुपये प्रति लिटर होता, तो २०२६ मध्ये १०२.१२ रुपये प्रति लिटरपर्यंत पोहोचला आहे. तसेच डिझेलचा दर ५६.७१ रुपयांवरून ९५.२० रुपये प्रति लिटर झाला आहे," असे खर्गे यांनी म्हटले.

इंधन दरवाढीनंतर एचपीसीएल, बीपीसीएल आणि आयओसी या कंपन्यांच्या शेअर्समध्ये अनुक्रमे ५.८ टक्के, ४.४४ टक्के आणि ३.९० टक्क्यांनी वाढ झाल्याचे नमूद करत, "लोकांपेक्षा नफा हाच भाजपचा डीएनए आहे," अशी टीकाही खर्गे यांनी केली. "इंधन दरवाढीचा थेट परिणाम घरगुती बजेटवर होतो. त्याचे परिणाम वाहतूक, शेती, उद्योग आणि महागाईवरही होतात. शेतकरी, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसह समाजातील प्रत्येक घटकाला याचा फटका बसत आहे," असा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, १५ मेपासून इंधन दरांमध्ये पुन्हा सुधारणा सुरू झाल्यानंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात एकूण जवळपास ७.५ रुपये प्रति लिटर वाढ झाली आहे. त्यामुळे महागाईचा दबाव आणि वाहतूक खर्च वाढण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

## द्विशा शर्मा प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : मॉडेल-अभिनेत्री द्विशा शर्मा मृत्यू प्रकरणात न्यायपालिका आरोपींना पाठीशी घालत असल्याचे चित्र उभे करणाऱ्या वृत्तांमुळे आपल्याला "दुःख" झाल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी म्हटले. तसेच या "दुर्दैवी घटनेची" चौकशी निष्पक्षपणे आणि कायद्यानुसार केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन न्यायालयाने दिले.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय चौकशीची शिफारस करण्यात आल्याची नोंद घेतली. तपास सीबीआयकडे सोपवण्याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असे आश्वासन सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयात दिले. वार्तांकन करताना प्रसारमाध्यमांनी संयम बाळगावा, असे आवाहन न्यायालयाने केले. पीडितेच्या कुटुंबीयांचे जबाब थेट प्रसारित करू नयेत किंवा त्यांचे दुःख छोट्या-छोट्या वाक्यांत मांडू नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

"काही कृतींमुळे आम्हाला दुःख झाले आहे. प्रसारमाध्यम मित्रांनी पीडितेच्या किंवा दुसऱ्या कुटुंबाच्या भावना लक्षात घेऊन जबाब नोंदवताना संयम ठेवावा," असे न्यायालयाने म्हटले. खंडपीठाने म्हटले की, या प्रकरणात विशिष्ट कथानक उभे करण्याचा प्रयत्न टाळला पाहिजे. संभाव्य साक्षीदारांचे जबाब सार्वजनिकरीत्या प्रसारित झाल्यास तपासावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, अशीही चिंता न्यायालयाने व्यक्त केली. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचेही कौतुक केले. या प्रकरणात तातडीने दुसऱ्या शवविच्छेदनाचे आदेश दिल्याबद्दल उच्च न्यायालयाच्या भूमिकेची प्रशंसा करण्यात आली.

आरोपी पक्षाच्या वकिलांनी खंडपीठाला आश्वासन दिले की, तपासासंदर्भात कोणतेही सार्वजनिक विधान केले जाणार नाही. मध्य प्रदेश सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, प्रसारमाध्यमांच्या हस्तक्षेपामुळे या प्रकरणात तपासाला गती मिळाली आहे.

## राजौरीत 'ऑपरेशन शेरुवाली' सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यात संशयित दहशतवाद्यांच्या शोधासाठी सुरू करण्यात आलेले 'ऑपरेशन शेरुवाली' सोमवारी तिसऱ्या दिवशीही सुरू होते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

संशयित दहशतवाद्यांच्या हालचालींबाबत विशिष्ट गुप्त माहिती मिळाल्यानंतर लष्कर, जम्मू-काश्मीर पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) संयुक्त पथकाने शनिवारी या भागात शोधमोहीम सुरू केली होती.



'ऑपरेशन शेरुवाली'दरम्यान शनिवारी डोरिमल-गंभीर मोगला परिसरात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली होती. त्यानंतर संपूर्ण परिसरात कडक घेराबंदी करण्यात आली असून जंगलमय भागात व्यापक शोधमोहीम राबवली जात आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित दहशतवाद्यांशी संपर्क आल्यानंतर काही काळ गोळीबार झाला. प्राथमिक माहितीनुसार, या भागात दोन ते तीन दहशतवाद्यांच्या हालचाली होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

व्हाईट नाईट कॉर्प्स यांनी सांगितले की, पोलीस आणि सीआरपीएफच्या मदतीने गुप्त माहितीच्या आधारे संयुक्त कारवाई करण्यात आली. शनिवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास गंभीर मोगला परिसरात दहशतवाद्यांशी संपर्क झाला होता. सुरक्षा दलांकडून परिसरात पाळत वाढवण्यात आली असून संशयित दहशतवाद्यांचा शोध सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## सीजेपी प्रकरणावर तातडीच्या सुनावणीस नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सोशल मीडियावर, विशेषतः तरुणांमध्ये चर्चेत आलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी) या व्यंगात्मक डिजिटल संघटनेच्या चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तातडीची सुनावणी देण्यास नकार दिला. या प्रकरणात "कोणतीही गंभीर तातडी नाही," असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीस आली होती. याचिकाकर्त्यांतर्फे वकील एन. के. गोस्वामी यांनी बाजू मांडताना, सरन्यायाधीशांच्या कथित वक्तव्यांनंतर सोशल मीडियावर "विकृत आणि द्वेषपूर्ण कथानक" सुरू असल्याचा दावा केला. १५ मे रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही तरुणांना "झुरळे" आणि "परजीवी" असे संबोधल्याचा आरोप सोशल मीडियावर करण्यात आला होता. त्यानंतर 'कॉकरोच जनता पार्टी' या नावाने व्यंगात्मक डिजिटल मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला.

यावर प्रतिक्रिया देताना सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी, "हे इतकं भावनिकतेने घेऊ नका," असे सांगत याचिकाकर्त्यांना संयम बाळगण्याचा सल्ला दिला.

दरम्यान, दुसऱ्या एका वकिलाने न्यायालयात बनावट कायद्याच्या पदव्यांच्या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, अशी मागणी केली. न्यायालयीन कामकाजातील देवाणघेवाणीचा वापर व्यावसायिक हेतूंसाठी केला जात असल्याबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली. यावर सरन्यायाधीश म्हणाले, "अशी कोणतीही गंभीर तातडी नाही. पुढे पाहू."

याचिकेत न्यायालयीन कामकाजादरम्यान केलेल्या तोंडी निरीक्षणांचा कथित व्यावसायिक गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच बनावट पदव्या वापरून वकिली करणाऱ्या कथित खोट्या वकिलांची चौकशी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

१६ मे रोजी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी आपल्या वक्तव्याबाबत स्पष्टीकरण देताना, माध्यमांतील काही वृत्तांमुळे आपल्याला "दुःख" झाल्याचे म्हटले होते. त्यांनी स्पष्ट केले की, त्यांची टिप्पणी "बनावट आणि खोट्या पदव्यांच्या आधारे वकिली व्यवसायात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना उद्देशून होती," मात्र काही माध्यमांनी ती चुकीच्या पद्धतीने सादर केल्याचा आरोप त्यांनी केला.

## 'अनंतपुरम लिंबू'च्या जीआय टॅगसाठी अर्ज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अमरावती** : आंध्र प्रदेश मधील शेतकरी आणि फलोत्पादन विभागाच्या अधिकाऱ्यांनी 'अनंतपुरम लिंबू'साठी भौगोलिक संकेत (जीआय) टॅग मिळवण्यासाठी अर्ज दाखल करून स्थानिक लिंबाच्या ओळखीच्या जतनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

या अर्जामध्ये अनंतपूर जिल्ह्यात पिकवल्या जाणाऱ्या लिंबाच्या



वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांवर भर देण्यात आला आहे. हा जिल्हा राज्यातील प्रमुख लिंबू उत्पादक क्षेत्रांपैकी एक मानला जातो. येथील लाल वालुकामय माती आणि हवामानामुळे या लिंबाला तीव्र सुगंध, उच्च आंबटपणा, भरपूर रस आणि अधिक टिकवण क्षमता प्राप्त होते.

जीआय (नोंदणी आणि संरक्षण) अधिनियम, १९९९ अंतर्गत या उत्पादनाला कायदेशीर संरक्षण मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जीआय टॅग मिळाल्यानंतर, केवळ अनंतपूरच्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात पिकवलेल्या लिंबांनाच 'अनंतपुरम लिंबू' या नावाने विक्री करता येणार आहे.

स्थानिक शेतकरी आणि जिल्हा प्रशासनाचा विश्वास आहे की, जीआय टॅगमुळे 'अनंतपुरम लिंबू'ला देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक ओळख आणि मूल्य मिळेल. यामुळे ब्रँडिंगला चालना मिळण्यासोबतच बनावट उत्पादनांना आळा बसेल आणि लिंबू लागवडीवर अवलंबून असलेल्या हजारो लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

## 'शोधा, हटवा आणि हद्दपार करा' धोरण

# बंगालमध्ये घुसखोरांविरोधात कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : सुवेंदू अधिकारी यांनी राज्यातील कथित घुसखोरांविरोधात कठोर भूमिका घेत 'शोधा, हटवा आणि हद्दपार करा' ही मोहीम सुरू केली असल्याची घोषणा केली आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणाच्या धर्तीवर ही मोहीम राबवली जात असल्याचे सांगितले जात आहे.



राज्याच्या गृह व डोंगराळ व्यवहार विभागाच्या परदेशी शाखेने २३ मे रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, जिल्हाधिकाऱ्यांना अटक करण्यात आलेल्या परदेशी नागरिकांसाठी तसेच सुटका झाल्यानंतर हद्दपारीच्या प्रतीक्षेत असलेल्या कैद्यांसाठी स्थानबद्धता केंद्रे उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सरकारी आदेशात, "हद्दपारीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित परदेशी नागरिकांना ठेवण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण कराव्यात," असे नमूद करण्यात आले आहे. या आदेशाच्या प्रती पोलीस महासंचालक, विविध पोलीस आयुक्तालये, पोलीस अधीक्षक आणि एफआरआरओ यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही केंद्रे बेकायदेशीर वास्तव्याच्या संशयावरून ताब्यात घेतलेल्या व्यक्तींसाठी तात्पुरत्या संक्रमण केंद्रांप्रमाणे कार्य करतील. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, अशा संशयित परदेशी नागरिकांना त्यांचे राष्ट्रीयत्व आणि कागदपत्रांची पडताळणी होईपर्यंत ३० दिवसांपर्यंत ठेवता येणार आहे.

या प्रक्रियेत बायोमेट्रिक माहिती संकलित करून ती केंद्रीय पोर्टलवर अपलोड केली जाणार असून, ओळख पटलेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांना पुढील कारवाईसाठी सीमा अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले जाणार आहे. नागरिकत्व निश्चितीचा अंतिम निर्णय जिल्हाधिकारी किंवा समकक्ष अधिकाऱ्यांकडून घेतला जाणार आहे.

## नीटमधील अनियमिततेवर 'सर्वोच्च' नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : नीट परीक्षेतील वारंवार होणाऱ्या अनियमिततेबद्दल सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तीव्र चिंता व्यक्त केली. राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) पूर्वीच्या चुका सुधारण्यात अपयशी ठरल्याची "दुःखद" बाब असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार, एनटीए आणि सीबीआय यांना नोटीस बजावत प्रतिसाद मागवला. तसेच, याचिकाकर्त्यांना त्यांच्या याचिकांच्या प्रती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना देण्याचे निर्देश दिले.

खंडपीठाने एनटीएला गुरुवारपर्यंत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले असून, २०२४ मधील नीट पेपरफुटी प्रकरणानंतर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती पावले उचलण्यात आली, याची माहिती देण्यास सांगितले आहे. "ही खेदाची गोष्ट आहे की, त्यांनी धडा शिकलेला नाही. हे प्रकरण यापूर्वीही न्यायालयासमोर आले होते. त्यावेळी देखरेख समिती स्थापन करण्यात आली होती आणि तिच्या शिफारसी स्वीकारण्यात आल्या होत्या," असे न्यायालयाने नमूद केले.

फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन (फायमा) यांनी वकील तन्वी दुबे यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने, यासंदर्भातील सर्व याचिका एकत्रितपणे ऐकल्या जातील, असे स्पष्ट केले. तसेच, एनटीएच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या इस्रोचे माजी प्रमुख के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील समितीला न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्देशांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. याचिकेत नीट-यूजी परीक्षा आयोजित करण्यासाठी एनटीएची पुनर्रचना करावी किंवा त्याऐवजी अधिक मजबूत आणि स्वायत्त यंत्रणा स्थापन करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे २२.७ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांवर "थेट हल्ला" होत असल्याचा दावा फायमाने केला आहे.

## टीएमसी नेत्यांचा सीजेपीला पाठिंबा

**नवी दिल्ली** : तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी आणि पक्षाचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'ला पाठिंबा दर्शवला आहे, असे टीएमसीचे राज्यसभा नेते डेरेक ओ'ब्रायन यांनी सांगितले. ओ'ब्रायन म्हणाले की, टीएमसी नेतृत्व "चांगला लढा लढण्यावर" लक्ष केंद्रित करत आहे. संपूर्ण आठवडाभर ममता तसेच अभिषेक यांच्यासोबत उद्देशपूर्ण बैठका झाल्या. दोघीही चांगल्या कामासाठी लढण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत, असे ओ'ब्रायन म्हणाले.

## आसाम विधानसभेत समान नागरी विधेयक सादर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी** : आसाम विधानसभेत समान नागरी संहिता (यूसीसी) विधेयक सादर करण्यात आले असून, विरोधी पक्षाच्या आमदारांनी या विधेयकाला जोरदार विरोध दर्शविला आहे.

राज्य मंत्रिमंडळाने यापूर्वीच या विधेयकाला मंजुरी दिली होती. उत्तराखंड आणि गुजरातनंतर यूसीसी विधेयक सादर करणारे आसाम हे देशातील तिसरे राज्य ठरले आहे. या विधेयकातून आदिवासी समुदायांना वगळण्यात आल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

राज्य सरकारच्या म्हणण्यानुसार, आसामच्या सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय विविधतेचा विचार करून हे विधेयक तयार करण्यात आले आहे. या मसुद्यात बहुपत्नीत्वाच्या प्रथेवर बंदी, विवाहासाठी किमान कायदेशीर वय निश्चित करणे, सर्व विवाह व घटस्फोटांची शासकीय नोंदणी अनिवार्य करणे, मुलींना वडिलोपार्जित मालमत्तेत समान हक्क देणे आणि लिव्ह-इन रिलेशनशिपसाठी कठोर नियम लागू करणे अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत.

हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले की, हा कायदा धार्मिक परंपरा, पूजा-पद्धती किंवा धार्मिक विधींमध्ये हस्तक्षेप करणार नाही. विरोधकांनी राजकीय हेतूने हे पाऊल उचलल्याचा आरोप केला आहे.

## ९० विमानांची निर्मिती भारतात केली जाणार

# भारत-फ्रान्समध्ये ११४ राफेल विमानांचा करार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारताने संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेला चालना देण्यासाठी आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमाला बळ देण्यासाठी फ्रान्ससोबत मोठ्या लष्करी कराराची तयारी सुरू केली आहे. या प्रस्तावित करारानुसार भारत राफेल लढाऊ विमानांची खरेदी करणार असून, त्यापैकी तब्बल ९० विमानांची निर्मिती भारतात केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.



माहितीनुसार, भारतीय हवाई दलासाठी ११४ बहुउद्देशीय लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी संरक्षण खरेदी परिषदेकडून मंजुरी मिळाल्यानंतर अधिकृत मागणीपत्र तयार करण्यात आले आहे. हे पत्र फ्रान्सला पाठवल्यानंतर विमानांची किंमत, वितरण वेळापत्रक आणि लॉजिस्टिक सहाय्याबाबतची माहिती भारताला दिली जाणार आहे. त्यानंतर संरक्षण मंत्रालयाकडून प्रस्तावासाठी अधिकृत विनंती जारी केली जाणार असून अंतिम वाटाघाटी सुरू होतील.

या करारानुसार सुमारे २४ राफेल विमाने पूर्णपणे तयार स्वरूपात फ्रान्समधून भारतात आणली जातील. उर्वरित ९० विमानांची निर्मिती भारतात केली जाणार आहे. यासाठी फ्रान्सची डसॉल्ट एव्हिएशन कंपनी भारतीय संरक्षण क्षेत्रातील भागीदारासोबत संयुक्त उत्पादन सुविधा उभारणार असल्याचे समजते.

या करारात भारताने महत्त्वाची अट घातली असून, भारतात तयार होणाऱ्या राफेल विमानांमध्ये किमान ५० टक्के स्वदेशी घटकांचा वापर अनिवार्य असणार आहे. रडार, इलेक्ट्रॉनिक्स, शस्त्रसज्जता आणि इतर महत्त्वाचे भाग 'मेड इन इंडिया' असावेत, अशी भूमिका भारताने मांडली आहे. फ्रान्सनेही ही अट मान्य करण्याची तयारी दर्शविल्याचे वृत्त आहे.

सध्या भारतीय हवाई दलाकडे राफेल विमानांच्या दोन तुकड्या कार्यरत आहेत. ही विमाने अंबाला आणि हाशिमारा हवाई तळांवर तैनात आहेत. याशिवाय भारतीय नौदलही आपल्या विमानवाहू जहाजांसाठी २६ राफेल-एम विमानांचा समावेश करण्याच्या तयारीत आहे.

राफेल विमानांच्या देखभाल, दुरुस्ती आणि प्रशिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा भारतात आधीपासून उपलब्ध असल्याने नव्या विमानांच्या समावेशासाठी स्वतंत्र मोठी व्यवस्था उभारण्याची आवश्यकता कमी राहणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर खर्चात बचत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.